वर्ष २०
अंक ६ वा
१५ डिसेंबर १९४६

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत
३
आणे

# अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मोहनिद्रा—६ ... ... ... ... | ११३ |
| २ | सुलभ-प्रेम-शास्त्र ... ... ... ... | ११९ |
| ३ | शिस्तीचे गैरशिस्त प्रयत्न ... ... ... | १२४ |
| ४ | पत्रव्यवहार ... ... ... ... | १२८ |
| ५ | शारदेचें पत्र ... ... ... ... | १३२ |
| ६ | ब्रह्मदेवाचा दिवस ... ... ... ... | १३६ |



## स मा ज स्वा स्थ्य

### वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी दोन रुपये, व्ही. पी. ने सवादोन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर अडीच रुपये किंवा चार शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. नमुना अंक ( आम्हास वाटेल तो ) फुकट पाठवूं. पुणें येथील ग्राहकांनी ६९–१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें, येथें वर्गणी भरल्यास चालेल.

राजिट अेजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई–४

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मोहनिद्रा—६

—★—

मोहनिद्रेंत केलेली सूचना जी अितकी परिणामकारक होते, तिचें कारण आपण असें पाहिलें की या स्थितींत मनुष्याची विचारशक्ति नाहीशी झालेली असते आणि त्याला जें सांगावें तें खरें वाटतें. हीच मनःस्थिति लहान मुलांत स्वभावतः सांपडते, म्हणजे त्यांना विचार करण्याची शक्तिच अजून आलेली नसल्यामुळें मोठीं माणसें जें सांगतील तें तीं खरें मानतात. अर्थात् ‘ तुला हात हालवता येणार नाहीं ’ असें त्यांना सांगितलें तर खरें वाटणार नाही, पण ज्या गोष्टींचा प्रत्यक्ष पुरावा नसतो, अशा गोष्टी मोठ्या माणसांच्या सांगण्यावरून खऱ्या मानण्याची त्यांची प्रवृत्ति असते. धर्माचीं तत्वें याच काळांत त्यांच्या मनावर ठसवण्यांत येतात आणि यामुळे मुलें मोठीं झाल्यावर देखील त्यांना असामान्य विचारशक्ति नसेल तर या तत्वांवरची त्यांची श्रद्धा ढळत नाही आणि धर्माच्या बाबतींत बुद्धिवाद लटपटतो. कित्येक शहाणींसुरतीं माणसें जे कित्येक अंधविश्वास दाखवतात, त्याचें कारण हेंच. मोहनिद्रेंतील माणसांप्रमाणें त्यांची कांहीं बाबतींतील विचारशक्ति नाहीशी झालेली असते.

कांही बंडखोर वृत्तीचे लोक मात्र मोठेपणीं स्वतंत्रपणें विचार करूं लागतात आणि त्यांच्या मनांत या जुनाट मतांबद्दल अविश्वास उत्पन्न होतो. अर्थात् जेव्हा मनुष्य भावनावश होतो, तेव्हा तेथे तर्कशास्त्र लटपटतेंच, कारण अशा वेळीं मनुष्य विचार करण्याच्या स्थितींत नसतो. पण अेक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे की मनाला विसंगति खपत नाही. तेव्हां अेकंदां अेक

मत खरें म्हणून ग्राह्य झालें की आपण त्याला तर्कशास्त्राचाहि पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतों, मग तें तर्कशुद्ध असो की नसो. मोहनिद्रेंतील मनुष्य जसें निक्षून सांगतो की ' छे छे, मी चूक केलीच नाही, ' तशीच सामान्य मनुष्याची वृत्ति श्रद्धेने स्वीकारलेल्या मतांच्या बाबतींत असते.

निद्रेचे पुष्कळ प्रकार असतात. सामान्य निद्रेंत देखील पुष्कळ वेळां सूचनेचा परिणाम दिसतो. यामुळेच आपल्याला अमुक वेळीं जागें झालें पाहिजे अशी आपणच आपल्याला सूचना दिली असली, तर आपण नेमके त्या वेळीं जागे होतों, असा कांहींचा अनुभव आहे. अर्थात् सर्वांचीच झोप अशा प्रकारची नसते. सामान्य निद्रेचा अभ्यास करणारांना अनेक चमत्कार दिसतात. स्वतःच्या नांवाचा कोणी हळू उच्चार केला तरी पुष्कळ माणसें ताबडतोब जागीं होतात, पण अितर आवाज मोठे असले तरी तीं जागीं होत नाहीत. डाक्तराच्या निजायच्या खोलींत त्याला बोलावण्याकरतां घंटा ठेवलेली असली, तर तो पुष्कळ वेळां पहिल्या ठोक्याला जागा होतो. तारेचा कारकून झोपी गेला असला तरी तारायंत्र सुरू झाल्याबरोबर जागा होतो. म्हणजें अमुक काम महत्वाचें आणि त्याकरतां जागें झालें पाहिजे, अेवढ्या भावनेनेंच मनुष्य ताबडतोब जागा होतो.

झोपेंत बाह्य जगाची जाणीव नसली तरी मेंदूला झोप लागत नाही. मेंदूचें काम चालू असल्यामुळेच स्वप्नें पडतात. स्वप्नांत कित्येकांनी कविता लिहिलेल्या आहेत, संगीत लिहिलेलें आहे, कठिण प्रश्न सोडवलेले आहेत, आणि या सर्व गोष्टी जागें झाल्यावर त्यांना लिहून ठेवतां आल्या आहेत, पण हे अपवाद होत. सामान्यतः स्वप्नांत विसंगत विचार आणि घटना यांची रेलचेल असते. स्वप्नांत कशाचेंहि आश्चर्य वाटत नाहीं. झोप फारशी गाढ लागलेली नसल्यास मोहनिद्रेसारखाच परिणाम होतो, म्हणजे अेखाद्याने अेखादें वाक्य उच्चारलें आणि त्याने तो मनुष्य जागा झाला नाही, तर मोहनिद्रेंतील सूचनेप्रमाणेच तो तें वाक्य खरें मानतो, असें कांही प्रयोगांत आढळलें आहे. मोहनिद्रेप्रमाणेंच स्वप्नांतही स्थिति होते, म्हणजे निद्रा हलकी असल्यास स्वप्नें लक्षांत राहतात, पण गाढ निद्रेंत पडलेलीं स्वप्नें नंतर आठवत नाहीत.

झोपेंत चालणारे किंवा अितर कामें करणारे लोक कांहींच्या पाहण्यांत असतील. झोपेंत चालणाऱ्या माणसाला वाट दिसते, पण कोणी त्याच्याकडे पहात असला तर तो त्याला दिसत नाही, आणि कांही बोललेलें सामान्यतः अैकूंही येत नाही. पण त्याच्या मनांत चाललेल्या विचारांशीं जर त्या बोलण्याचा संबंध असला, तर मात्र अैकूं येतें. मोहनिद्रेप्रमाणेंच अशा अेका प्रसंगांत केलेल्या गोष्टी दुसऱ्या प्रसंगीं आठवतात, पण जागेपणीं आठवत नाहीत.

आतां मोहनिद्रेपासून धोके कोणते आहेत ते पाहूं. पुष्कळ कादंबऱ्यांत आणि नाटकांत मोहनिद्रेचा उपयोग केलेला असतो, पण लेखकांना या विषयाची माहिती नसल्यामुळे माहितगार लोकांना हंसूं येतें. वाचकांना किंवा प्रेक्षकांनाही सामान्यतः माहिती नसतेच, यामुळे कांहीही लिहिलें तरी चालतें-तेव्हा खरे धोके कोणते आहेत ते पाहणें जरूर आहे.

अेक प्रश्न असा की मोहनिद्रेंतील सूचनेमुळे मनुष्य गुन्ह्याला प्रवृत्त होअील काय? होअील हें उघड दिसतें, कारण मोहनिद्रेंत सूचनेप्रमाणें वागण्याची प्रवृत्ति असते आणि विचार करण्याची शक्ति नसते, तेव्हा अमुक गोष्ट गुन्हा आहे हा विचार मनांत येणार नाही. तज्ज्ञांचें म्हणणें असें आहे की रोग्यावर अितका परिणाम होण्यास गाढ निद्रा असावी लागते आणि ती शेंकडा पंधरापेक्षा जास्त रोग्यांत सांपडत नाही. मोहनिद्रेची सबब गेल्या शतकांतील अेका प्रसिद्ध खुनाच्या खटल्यांत कोर्टांत सांगितली होती, पण ती खरी न मानतां आरोपीला शिक्षा झाली.

आणखी अेक गुन्हा म्हणजे मोहनिद्रेचा प्रयोग पुरुषाने स्त्रीवर करून ती गाढ निद्रेंत असतां तिच्याशीं समागम करणें. असें झाल्यास कदाचित् पुढे स्त्री गरोदरही होअील आणि तिला कांही कारण कळणार नाहीं, किंवा तशी सूचना दिलेली असल्यास ती भलत्याच माणसाचें नांव सांगेल, पण या गुन्ह्यांत अेक धोका मात्र असतो, की ती स्त्री जर शारीरिक 'पावित्र्याला' महत्त्व देणारी असली, तर अशा कृतीमुळें तिला जबर धक्का बसेल आणि ती जागी होअील, आणि गुन्हा उघडकीस येअील. तेव्हां कुशल प्रयोजक अशा रीतीने गुन्हा न

करतां तिला केवळ आपल्यावर प्रेम करण्याची सूचना मोहनिद्रेंत करील आणि नंतर त्याचा फायदा घेईल. अर्थात तिलाही यांत कांहीं वावगें दिसणार नाहीं, कारण अशीं सूचना दिली आहे याची तिला कल्पनाही नसेल. या शक्यतेमुळें अशा प्रकारचे खोटे आरोपही करणें शक्य आहे आणि कोर्टाला याचा निकाल करणें कठिण जाईल, अशा वेळीं मोहनिद्रेंतील तज्ञ बोलावून तिला पुन्हा मोह-निद्रेंत आणून तिच्याकडून खरें काढून घेतां येईल. ती मोहनिद्रेंतही खोटें बोलणार नाही असें नाहीं, तथापि तज्ञाला यांतून कांहीं सत्य कळूं शकेल. या-करतां अेका डाक्तरानें असें लिहिलें आहे की स्त्रीवर प्रयोग करणें झाल्यास कधीही ती अेकटी असतांना करूं नये, कारण खोटा आरोप येण्याचा संभव असतो. स्त्रियांनीही या बाबतींत सावध राहणें अिष्ट आहे.

आणखी अेक धोका म्हणजे अेखाद्याला मोहनिद्रेंत कांहीही खूण राहिल्या-शिवाय ठार मारतां येईल, कारण हृदयाच्या कार्यावर सूचनेने परिणाम करतां येतो आणि तें अजीबात थांबवणें देखील अशक्य नाहीं. किंवा अेखाद्याला सूचनेने चेक लिहायला, किंवा मृत्युपत्र देखील करायला लावतां येईल. अशा तऱ्हेचे प्रयोग केलेले आहेत आणि अेका माणसाने अेका काल्पनिक संस्थेला मोठी देणगी अशा रीतीनें दिली, आणि हे आपण स्वखुषीनें करीत आहों असें लिहून दिलें.

खुनासारख्या गुन्ह्याचे बाबतींत मात्र मोहनिद्रेंतील मनुष्य सर्वस्वी सूचनेच्या आहारीं जात नाही, कारण खुनांनी मनाला मोठा धक्का बसतो. ल्येज्वा नांवाच्या अेका डाक्तरानें असें अेक उदाहरण दिलें आहे की त्याने अेका पस्तीस वर्षांच्या बाईला मोहनिद्रेंत आणून तिच्या देखत अेक पांढरी पूड पाण्यांत विरवली आणि ती सोमल आहे असें तिला सांगितलें व नंतर सूचना दिली कीं ‘ आतां अेक गृहस्थ प्यायला पाणी मागतील, तेव्हा हें ग्लास त्यांना द्या. ’ पण त्या गृहस्थाने अकस्मात् प्रश्न विचारला, ‘ ग्लासांत काय आहे ? ’ तेव्हा तिने सरळ उत्तर दिलें की ‘ सोमल आहे. ’ तेव्हा पुढच्या प्रयोगांत आणखी अेक सूचना दिली की ‘ ग्लासांत काय आहे असें कोणी

विचारलें तर साखर आणि पाणी आहे असें सांगा.' त्याप्रमाणें तिने केलें. नंतर जागेपणीं तिला प्रश्न केला तेव्हा ती म्हणाली, 'मी कोणालाही कांही प्यायला दिलें नाही आणि मला यांतलें कांहीं माहीत नाही.'

तरीपण सामान्यतः सूचनेने गुन्हा करवणें अतिशय कठिण जाअील, कारण सूचनेने देखील मनुष्याची नैतिक भावना अजीबात नाहींशी करतां येत नाही. 'जागा झाल्यावर अमुक माणसाच्या मुस्कटांत मार,' अशी सूचना अेखाद्याला दिली तर तो तसें करील, पण तो अितक्या हळू मारील की त्याने बिलकुल अिजा होणार नाहीं. येथें दिलेल्या सूचनेचें आणि नैतिक भावनांचें युद्ध होते आणि अशीं कांहीं तडजोड शक्य असल्यास होते, किंवा ती सूचना अंमलांत आणली जात नाही. असें होऊं नये म्हणून आणखी कांहीं सूचना दिल्या तर गाढ निद्रेंतच कदाचित् अेखादा मनुष्य त्या सूचना अंमलांत आणील. पण यामुळें तो मोहनिद्रेंतच आहे हें लोकांना कळेल आणि हें करवणारा कोण याचा तपास सुरू होअील. तेव्हा अेखाद्याकडून असा गुन्हा करवणें अतिशय कठिण आहे.

परंतु अेखाद्याला सूचनेने आत्महत्या करायला लावतां येअील, किंवा बायकोला टाकून द्यायला लावतां येअील, आणि हें त्यानें स्वखुषीनें केलें नाही हें कोणालाही ओळखणार नाही, कारण सूचनेची जाणीव रोग्याला नसते आणि आपण खुषीने सर्व करीत आहों असेंच तो समजत असतो. डाक्तरांनीही हे धोके लक्षांत ठेवणें जरूर आहे आणि प्रामाणिक डाक्तरांवर अशा प्रकारचे खोटे आरोप येऊं नये, म्हणून त्यांनी पुढील खबरदाऱ्या घ्याव्या, असें बेर्नहाअिम यांनी लिहून ठेवलें आहे. १ कोणावरही त्याच्या स्वतःच्या किंवा त्यावर ज्यांचा अधिकार असेल अशा व्यक्तींच्या, लेखी संमतीशिवाय मोहनिद्रेचा प्रयोग करूं नये. २ रोग्याशिवाय कोणीतरी अधिकारी मनुष्य तेथे हजर असावा, म्हणजे डाक्तराला व रोग्यालाही त्यापासून संरक्षण मिळेल. ३ रोग बरा करण्याकरतां जरूर असतील तेवढ्याच सूचना रोग्याला द्याव्या. प्रयोगाकरतां किंवा शास्त्रीय ज्ञान मिळवण्याकरतां देखील अितर कोणत्याही सूचना देण्याचा अधिकार

डाक्तराला नाही आणि रोग्याने संमति दिलेली असली तरीदेखील तसा प्रयत्न करूं नये, रोग्यावर कोणताही वाअीट परिणाम होणार नाही अशाच सूचना द्याव्या. अिंग्लंडांत व येथेंही करमणुकीकरतां मोहनिद्रेचे प्रयोग दाखवण्यास बंदी नाही, परंतु अशी बंदी करणें जरूर आहे. अितकी खबरदारी घेतल्यास पुष्कळ रोगांत मोहनिद्रेपासून रोग्याचा फायदा करून देतां येतो.

अशा कांहीं रोग्यांच्या हकीकती पुढें दिल्या आहेत. अेका पंचवीस वर्षांच्या स्त्रीला बरीच कारकुनी करावी लागल्यामुळे तीन वर्षांपासून तिच्या उजव्या हाताची शक्ति कमी झाली होती आणि टांक नीट चालवतां येत नाहीसा झाला होता. तिच्यावर विजेचे उपचार केले होते, पण तिची स्थिति सुधारण्याऐवजी अितकी बिघडली की तिला कारकुनी सोडून अितर धंदे करावे लागले होते. दोनतीन ओळी लिहिल्या की तिचा आंगठा व शेजारचें बोट दुखूं लागे आणि प्रकोष्ठाचे स्नायुही दुखूं लागत, यामुळे अेक मिनिटही तिला लिहितां येअीना. तिला मोहनिद्रा दिली आणि या स्थितींत तिच्या त्या स्नायूंचें मर्दन केलें व दुःख कमी होअील अशी सूचना दिली. जागी केल्यावर कांही वेळ विश्रांति देऊन तिला पुन्हा लिहायला सांगितलें, तेव्हा तिला अर्धे पान लिहीपर्यंत वेदना झाल्या नाहींत. अशा तऱ्हेने आठवड्यांतून तीनदां असे उपचार दोन महिनेपर्यंत केल्यावर ती बरी झाली.

अेक प्रोफेसर विड्या फार ओढीत असे आणि त्याच्या पचनशक्तीवर व झोपेवर अनिष्ट परिणाम झाला होता. त्याला मोहनिद्रा देऊन सूचना दिली की, ' यापुढें तुला तंबाखु आवडणार नाही आणि संवय सहज सोडून देतां येअील. असें तीन दिवस लागोपाठ केल्यावर उपचार बंद केले. नंतर चौकशी करतां त्यानें पुढील पत्र लिहिलें, ' मी वीस वर्षांपासून विड्या ओढीत असतांही मला नंतर विडीची अिच्छा झाली नाही. अर्थात् संवय सुटल्यामुळें बराच त्रास झाला आणि अेकदम समजण्यासारखा कांहीं फायदाही झाला नाही, तेव्हां सूचनेचा अंमल नसता तर मी खात्रीने पुन्हा ओढूं लागलों असतों, पण आतां अिच्छाच होअीना. नंतर हळू हळू प्रकृति सुधारली आणि तेव्हापासून मी अेक-

दांही विडी ओढली नाहीं.

अशीं अनेक उदाहरणें सांगतां येतील आणि जरूर ती खबरदारी घेतल्यास मोहनिद्रेपासून फायदा होईल यांत शंका नाहीं, परंतु तशी खबरदारी घेणें शक्य नसल्यास आणि प्रयोग करणारा मनुष्य वाकबगार आहे अशी खात्री नसल्यास मोहानिद्रेंत फायद्यापेक्षां धोकाच जास्त आहे, असा मनुष्य डाक्तरच असावा हेंही अर्थातच पुनः सांगणें जरूर आहे. ( समाप्त )

---

# सुलभ-प्रेम-शास्त्र

## ( लघु नाटिका )

लेखक :—**स० हृदय**, महाड.

## अंक १ ला

( स्थळ : 'स्विमिंग पूल' समोरील वांकण. सरोज येतांना दिसतांच सागरला आनंद होतो. तो तिला सामोरा जातो. तीही घाईघाईने त्याच्याकडे येते. )

**सरोज**—किती वेळ झाला तुम्हाला ?

**सागर**—झाला अर्धा तास.

**सरोज**—अय्या ! फार वाट पाह्यला लागली तुम्हाला. पण गडे, माझा अिलाज नव्हता. आज आमच्या गिरगांव वॉर्ड ऑफिसांत रेशनिंग ऑफिसर आले होते.

**सागर**—अहो, पण मी कुठे तुम्हाला दोष देतोय ? तुम्ही आलांत हें विशेष !

**सरोज**—अिश्य ! आम्ही विसराळू नाही, म्हटलं.

**सागर**—तसं म्हटलं का मी ? ( आनंदून ) हा पहा चंद्रोदय होत आहे. आपल्याला बराच वेळपर्यंत चांदण्यांत हिंडतां येईल, हें भाग्य कांहीं

कमी नाहीं आमचं.

**सरोज**—( श्वास सोडीत ) दमलें बाअी माणसांचीं तींच तींच नांवं लिहून. मुंबअींत अितकीं माणसं आलीं कशाला कुणाला ठाऊक? उगीच मेला त्रास!

**सागर**—ऑफिसचं काम आहे तें.

**सरोज**—थंडी पडलीय, नाही आज?

**सागर**—हो, ना! डिसेंबरचा महिना आहे. समुद्राच्या लाटा कशा शांतपणें डोकावून पुढेपुढे सरकत आहेत. तो पहा समुद्राचा अथांग नीलिमा पश्चिमेकडून काळसर होत आला आहे. चांदणं पण कसं छान पडत आहे. तारका पहा, उगवतांनाच चकमक चकमक करीत लाजत आहेत. अहाहाहा! वारा कसा आल्हादकारक...मादक...नि शीतल वाटतोय.

**सरोज**—( उगीचच ) नि चंद्रोदय कसा होतोय?

**सागर**—( थांबून ) 'उदयति च शशांकः कामिनीगंडपांडुः'

**सरोज**—अिश्श!

**सागर**—कां? राग आला वाटतं?

**सरोज**—कवि आहां...नुसतेच.

## अंक २ रा

( कांहीं आठवडे गेल्यावर पुन्हा तो त्याच जागीं तिची वाट पहात बसलेला दिसतो, ठरलेल्या वेळीं सरोज येते.

**सागर**—आज अगदीं वेळेवर आलं अेक माणूस! चातकाला मेघबिंदूंची वाट फारशी पहावी लागली नाही.

**सरोज**—तुम्हाला सुचतंय काव्य. नि माझी नाही धडगत.

**सागर**—काय झालं?

**सरोज**—लढाअी बंद होणार. नि रेशनिंग-कचेऱ्या पण उठणार लौकरच टाळीं लागणार त्यांना.

**सागर**—कुणी सांगितलं तुला हें?

**सरोज**—अय्या! बाजूला कां झालां असें अेकदम? (थांबून) तो येतोय् तो तुमच्या ओळखीचा आहे वाटतं?

**सागर**—आमच्याच बँकेंत असतो. तो करील माझी थट्टा, म्हणून म्हटलं...

**सरोज**—यांत कसली होणार आहे तुमची थट्टा? तुमच्या हातांत आहे सारं कांहीं.

**सागर**—नाही, तरी...अतिरेक होऊन कसा चालेल?

**विद्याधर**—(समोरून) काय हो सागर? (खाकरतो) कसं काय? बरी आहे ना प्रकृति? असणारच. फिरायला येतां ना रोज? पाहतोंच मी नेहमी.

**सागर**—होय, ठीक आहे, बरी आहे. बरं, मी जरा घाअींत आहे, विद्याधर.

**विद्याधर**—दिसतंच आहे तें. पण सागर, असं मनावर दडपण ठेवून फिरत नका जाऊं बुवा. अगदी मोकळेपणानं हिंडावं माणसानं. नाही, तसं नाही...नशिब लागतं माणसाला.

**सागर**—खरं आहे, खरं आहे. समजलों मी. मला बढती मिळाली, नि पगार पण वाढलाय. देअीन मी उद्यां पेढे ऑफिसांत. किंवा फीस्टच देतों.

**विद्याधर**—पण काय हो, सागर? त्या...त्या कोण? तुमची वाट पाहताहेत वाटतं? तरीच तुम्ही घाअींत आहां. आहे बुवा! जीते रहो पठ्ठे!

**सागर**—काय, कुठं काय आहे? हं, हं...त्यांची माझी ओळख झाली, अशीच फिरायला येतांना वाटेंत. बरं, जाऊं मी?

**विद्याधर**—वुअिश यू गुड लक! (जातो)

**सागर**—सुटलों बुवा. पीडा नाहीतर! हे असे वागतात लोक, नाही का, सरोज? बोलत कां नाहीस? तुला काय वाटतं?

**सरोज**—खुळे आहांत तुम्ही.

---

## अंक ३ रा

[ आणखी पांचसहा आठवड्यांनी. तेंच स्थळ. तीच वेळ. :तो वाट पहात असतो, तों सरोज चर्नीरोड बागेंतून बाहेर येते. तो तिला बघतांच हंसून सलामी करतो. ती नाराज दिसते ]

**सागर**—कां ग, आज खुषींत नाही दिसत ?

**सरोज**—कुठं काय आहे ? कांही नाही.

**सागर**—चल, आपण 'डारियस'मध्यें चहा घेऊं.

**सरोज**—घेतला आहे आपण पुष्कळ वेळां.

**सागर**—बरं, 'मॅग्नोलिआ' मध्यें जाऊन चॉकोलेटचें आअिस्कीम घेऊं.

**सरोज**—पुष्कळ खाल्लंय् आपण दोघांनी.

**सागर**—बरं, हें बघ सरोज, या 'सी रूट'मधून आपण 'फ्लोरा फाउंटन'ला जाऊं उघड्या डेकमधून, आणि पुन्हा परत येऊं येथवर... काय ग ?

**सरोज**—कांही नको, मला सर्दी झालीय्.

**सागर**—तुझं चित्त आज ठिकाणावर नाही. काय, घडलं काय असं ?

**सरोज**—आजचा 'संध्याकाळ' वाचायचा होता.

**सागर**—काय, आहे तरी काय विशेष ?

**सरोज**—युद्ध थांबलं.

**सागर**--काय, म्हणतेस तरी काय, सरोज ?

**सरोज**--आतां सांगूं तरी काय तुम्हाला ? आपण अेका चाळींत राहतों, आपण अितके दिवस परस्परांच्या सहवासांत फिरलों, हंसलों. त्याचं तुम्हाला कांही नाही ? युद्ध संपलं तरी ?

**सागर**--( थांबून ) म्हणतेस तरी काय ?

**सरोज**—डोंबल तुमचं ! ( जरा दूर होते).

**विद्याधर**--( समोरून येत ) अरेच्या ! सागर, अितके दिवस झाले तरी अजून पन्नास टक्केच ? अहो शंभर टक्के कधी व्हायचेत ?

**सागर**—अरे आहे तरी काय ? रोजच भेटतो आहेस तूं आम्हांला. मांडलं आहेस तरी काय ?

**विद्याधर**—कांही विशेष नाही, अिकडे आलं म्हणजे सुंदर चेहऱ्याचीं झकपक पोषाख केलेलीं माणसं दिसतात. तेवढेंच डोळ्यांना सुख. तोच आमचा आनंद.

**सरोज**—तुम्ही यांच्याच बँकेंत असतां वाटतं ?

**विद्याधर**—होय, कां बरं ?

**सरोज**—चला कीं, बरोबरच फिरूं आपण.

**विद्याधर**—वा: ! आणखी काय पाहिजे माझ्यासारख्याला ?

**सागर**—छट् ! भागीदारी नाही पसंत आपल्याला. 'सोल राअिट्स्' चा मी भोक्ता आहें.

**विद्याधर**—पण मिळाले नाहीत ना तुला अजून ते ?

**सागर**—पण तुला तर कधीच मिळणं शक्य नाही.

**विद्याधर**—असं, होय ? काय हो, मिस...कराल का माझ्याशीं आपण लग्न ?

**सरोज**—हो, हो, हो ? अेका पायावर तयार आहे मी.

**सागर**—पण सरोज, सरोज, हें काय मी...आपण...

**सरोज**—तुम्ही कधी केली हो माझी मागणी ? कधी लगट, निदान स्पर्श तरी केला आहे तुम्ही मला ?

**सागर**—करणार होतों वेळ साधून. पण...पण...तूं

**विद्याधर**—प्रेमाच्या आघाडीवर अचानक आक्रमणाचीच मात्रा चालते.

**सरोज**—ठरलं ना आपलं, विद्याधर ?

**विद्याधर**—हो, पण अेका अटीवर. फक्त अेकच अट.

**सरोज**—ती कोणती ?

**विद्याधर**—अितकी पावडर फांसायची संवय टाकली पाहिजे.

**सरोज**—अिश्श ! ही कसली अट ? कांहीतरीच !

**सागर**—अरे पण आमचं अितक्या दिवसांचं प्रेम, सहवास, तुला त्याचं कांहीच कसं वाटत नाही, विद्याधर ?

**विद्याधर**—वा ! मला आनंद वाटतोय. तुला काय वाटतं, मिस्...

**सरोज**—गाढव आहेत हे !

---

# शिस्तीचे गैरशिस्त प्रयत्न

'नियम पाळावे, जरि म्हणसी योगी व्हावें,' या न्यायानें नियमांतच कांहीं पुण्य आहे, नियम हे केलेच पाहिजेत, मग त्यांचा कांही उपयोग असो की नसो, किंवा त्यांपासून कदाचित् कांहीं नुकसानही होत असो, कांहींतरी नियम करून ते पाळण्यांतच कांहीं पुरुषार्थ आहे, अशी ज्यांची कल्पना असेल ते वादाच्या पलीकडे आहेत. समंजस माणसाला त्यांच्याशीं वाद घालणें म्हणचे कालाचा अपव्ययच वाटेल. पण तसें ज्यांना वाटत नाही, त्यांना शिस्त देखील कधीं कधी गैरशिस्त असूं शकते हें पटणें कठिण नाहीं.

शिस्तीचा कांहीं वेळां आणि कांहीं बाबतींत उपयोग असतो, यांत शंका नाहीं. पहिल्या महायुद्धांत फ्रेंच सैन्यांत दाखल झालेले आमचे अेक हिंदी मित्र त्या सैन्यांतल्या शिस्तीचा अनुभव सांगत होते कीं नवीन भरती झालेल्या अिस‍माला बोलावून अेक अधिकारी विचारतो, 'या कागदाचा रंग कोणता ? तो अिसम म्हणतो, 'पांढरा' अधिकारी रागावून म्हणतो, 'गाढवा ! हा रंग तांबडा आहे, अेवढें कसें दिसत नाही तुला ?' यावर तो अिसम त्या कागदाला तांबडा म्हणाला तर ठीक, नाहीतर त्याला आठ दिवसांच्या नजरकैदेची शिक्षा होते. नंतर पुन्हा त्याची परीक्षा होते, आणि अधिकारी जें जें म्हणेल, तें तें तो कबूल करीपर्यंत त्याची सुटका होत नाही. ही पद्धत त्र टिकेंतल्या प्रतापरावाची आहे. आणि सामान्यतः ती योग्य आहे असें कोणी म्हणणार नाही, परंतु सैन्यांतल्या शिस्तीच्या दृष्टीनें हेंच शिकवायचें असतें की अधिकाऱ्यांचें म्हणणें

बिनतक्रार मान्य न केलें तर धोका आहे, तेथे स्वतः विचार करतां येत असला तरी तो बाजूला ठेवून हुकूम पाळला पाहिजे. फ्रेंच लोकांचा स्वभाव यंत्रासारखा हुकूम पाळण्याचा नसल्यामुळें याबद्दल विशेष काळजी घ्यावी लागते.

पुष्कळ आआीबापांची मुलांना शिस्त लावायची पद्धत देखील अशीच अेरावीची असते. मुलांनी कांहीं म्हटलें तरी त्याला निदान तात्पुरता तरी विरोध करायचा, अेकदम त्यांचें म्हणणें मान्य करायचें नाही, यालाच शिस्त समजणारे आआीबाप याबद्दल फुशारकी मारीत असतात. पण असल्या शिस्तीनें मुलें बिघडतात आणि आआीबाप म्हणतील त्याच्या बरोबर उलट वागण्याचा चोरून प्रयत्न करतात असा अनुभव आहे.

राजकीय पक्षांत देखील सभासदांना विचारस्वातंत्र्य नसतें, किंवा निदान मतस्वातंत्र्य नसतें आणि अशा शिस्तीचें कांहीं अंशीं समर्थन करतां येआील. वस्तुतः सर्व राज्यकारभार अेका पक्षाच्या हातीं देण्यासारखा आचरटपणा दुसरा नाही, पण अिंग्लंडांत चालू झालेली ही पद्धत आतां सर्व जगभर पसरली आहे, तेव्हां तिच्या अनुरोधाने वागावें लागतें. तरी देखील युद्धकालीं या नियमाला अपवाद करून अिंग्लंडांत सर्व पक्षांना राज्यकारभारांत स्थान द्यावें लागलें. देशाचें हित पहायचें असेल तर सर्व पक्षांच्या विचारवंतांना राज्यकारभारांत स्थान मिळालें पाहिजे, आणि याकरतां निवडणुकींत पक्षांचें प्राबल्य राहतां नये. पण हा रोग जडलेला आहे, आणि तो लवकर बरा होणें शक्य दिसत नाही. पक्षाचा कारभार जर्थातच लहानशा मंडळाच्या हातांत असतो आणि तें मंडळ ठरवील त्याप्रमाणें सर्व सभासदांना मतें द्यावीं लागतात. सैन्यांत जशी शिस्त मान्य करावी लागते, तशीच आणि त्याच कारणाकरतां राजकीय पक्षांतही शिस्त मान्य करावी लागते, कारण अेका पक्षाचे हितसंबंध अितर पक्षांपेक्षा वेगळे असतात, तेव्हां तेथेही सैन्याप्रमाणें कोणाच्या तरी नेतृत्वाखाली अेकजुटीने लढावें लागतें. पण राजकीय पक्षांतही पुष्कळ वेळां शिस्तीचा अतिरेक होतो. पुष्कळ वेळां पक्ष राजकीय आहे हें विसरून कांग्रेससारखा पक्ष शक्य तितक्या संस्था काबीज करून त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करूं पाहतो. नगरपालिकेंतील

निवडणुकींत पक्ष लढवून बहुमत करून घेऊन शहराच्या कारभारांत अरेरावीने दडपशाही करण्यांत कांहीं गैर आहे, हे कोणाच्या डोक्यांतही येत नाही. पण याचे परिणाम मात्र बरे होत नाहीत. वास्तविक ज्यांत राजकारणाचा संबंध नाही, त्यांत राजकीय पक्षांनी पक्ष म्हणून पडूं नये. पण अेकदां हुकमी बहुमताने पाहिजे तें करतां येतें अशी जाणीव झाली, म्हणजें हे राजकीय पक्ष त्याचा अयोग्य फायदा घेऊं लागतात. उदाहरणार्थ मुंबअीच्या नगरपालिकेंत संततिनियमनाकरतां केंद्रें स्थापन करण्याचा प्रश्न निघाला असतां तो कित्येक वर्षेपर्यंत केवळ कांग्रेसच्या हुकमी बहुमताने बाजूला टाकला गेला. म्हणज प्रत्येकाने स्वतःच्या विचाराने मत न देतां कांग्रेसश्रेष्ठींच्या हुकमाप्रमाणेंच मत दिलें पाहिजे, असा पक्षाच्या सभासदांना हुकूम मिळाल्यामुळें समाजाचें अपरिमित नुकसान झालें. यंदां मात्र तसा आदेश न दिल्यामुळें कांहीं कांग्रेसच्या सभासदांनीही अशी केंद्रें स्थापावीं असें मत दिलें आणि तसा ठराव झाला. ही पक्षाची शिस्त गैरशिस्त आहे असें कां म्हणूं नये?

या राजकीय पक्षाच्या धोरणामुळे लोकांचीं डोकीं बिघडून त्यांची विचारशक्ति नष्ट होत चालली आहे याचा प्रत्यय अनेक वेळां येतो. पक्ष कशाला म्हणावें हें देखील कित्येकांना कळत नाही आणि संयुक्त जबाबदारी, अेकजूट, वगैरे संवयींचे शब्द अस्थानीं वापरून लोक अर्थाचा अनर्थ करूं लागले आहेत. उदाहरणार्थ येथील अेका संस्थेच्या कार्यकारिणींत असा प्रश्न निघाला की कार्यकारिणीने मंजूर केलेला अेखादा ठराव जेव्हां कायम होण्याकरतां साधारण सभेपुढे जायचा असतो, तेव्हां कार्यकारिणीच्या सभासदांनी अेकजुटीने वागलें पाहिजे, तो कार्यकारिणीचा ठराव म्हणून तिच्या सर्व सभासदांनी ठरावाला पाठिंबा दिला पाहिजे, असा संकेत ठरवावा की काय? त्यांत तडजोड म्हणून असा अेक संकेत कोणीतरी सुचवला की अेखाद्या सभासदाचा ठरावाला विरोध असून त्याने तसा आग्रहच धरला, तर साधारण सभेंत विरोध करण्याची त्याला परवानगी असावी. वस्तुतः हा अेकजुटीनें वागण्याचा संकेत अितका हास्यास्पद आहे की तो कोणाही विचारवंताच्या

डोक्यांतच येऊं नये, पण तो आला अितकेंच नाही तर असा संकेत बहुमतानें मान्य झाला. राजकीय वातावरणामुळे राजकीय पक्षांच्या शिस्तीवर सभासद अितके भाळले की कार्यकारिणीला कोणताही पक्ष लढवायचा नसतो याचीही जाणीव त्यांना राहिली नाही. खरें पाहिलें तर कार्यकारिणी म्हणजे वेगळा पक्ष नव्हे, तिला कोणत्याही पक्षाशीं लढायचें नसतें. ती वेगळी संस्थाही नाही, सर्व सभासदांनी विश्वासानें निवडून दिलेल्या लोकांची ती बनलेली असते, म्हणजे ती वेगळी संस्था नसून तिचे हितसंबंध वेगळे नसतात. तेव्हां ते राखण्यासाठी शिस्त पाळण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही, अितकेंच नव्हे तर कार्यकारिणीच्या सभासदांनी असा संकेत करणें म्हणजे साधारण सभेला फसवणें आहे. कामाच्या सोयीकरतां निवडलेल्या कार्यकारिणीने स्वतःचा वेगळा गट कल्पून त्याला राजकीय पक्षांप्रमाणेंच शिस्त पाळायला लावणें, नुसतें हास्यास्पदच नसून अप्रामाणिक आहे. साधारण सभेंत कार्यकारिणीचे सभासद बसले म्हणजे ते त्या सभेचे सभासद असतात आणि अितर सभासदांचे सर्व हक्क त्यांनाही असले पाहिजेत. त्यांनी अमुक ठरावाला कार्यकारिणीच्या सभेंत पाठिंबा दिला होता, म्हणून येथेंही दिला पाहिजे, असाही नियम करणें गैर होअील. मग कार्यकारिणीच्या सभेंत त्यांनी विरोध केला असला तरीदेखील त्यांनी तसा आग्रहच धरला असला तरच त्यांना विरुद्ध मत देतां येअील, असा निर्बंध कां ? मत बदलण्याचा देखील अधिकार सर्वांना असला पाहिजे. कोणी कांही नवीन मुद्दे सांगितले, किंवा स्वतःला कांही नवीन मुद्दे सुचले, तर प्रामाणिक मनुष्याचें मत बदलणें शक्य असतें. तें हिशेबांत न धरतां विरोध केलेल्या सभासदांवर मोठा उपकार म्हणून त्यांनी तसा आग्रहच धरला असेल तर विरुद्ध मत देण्याची परवानगी मेहेरबानीने देणें, ही अरेरावीची शिकस्त आहे. सभासदांची सर्व विचारशक्ति कामाला लावून घेण्याचा साधारण सभेचा हक्क आहे. त्यांतल्या कांही सभासदांना विचार करण्याची बंदी करणें, म्हणजे सभेच्या हक्कांची पायमल्ली आहे आणि ती करण्याचा अधिकार कोणत्याही कार्यकारिणीला पोंचत नाही, आणि कार्यकारिणीने स्वतःचा वेगळा गट मानून

त्याप्रमाणें वागणें हा सभेचा उपमर्द आहे. पण हें कोणाच्या डोक्यांतच शिरत नाही. शिस्त, नियम, अराजक वगैरे शब्दांनीच लोक आपली फसवणूक करून घेतात. तेव्हां त्यांची विचारशक्तिच नष्ट झाल्याचा हा पुरावा नव्हे तर काय ?

---

# पत्रव्यवहार

## १

स. न. वि. वि. पुढील मजकूर 'बलवंत' मासिकाकडे पाठवला होता, तो त्यांनी न छापल्यामुळे आपणाकडे पाठवीत आहें. विक्रीकराला १ ऑक्टोबर पासून सुरवात होऊन व्यापारी सरसकट रुपयाला दोन पैसे प्रमाणें हा कर गिऱ्हाइकाकडून घेत असतात, त्यांत कोणत्या मालावर कर आहे आणि कोणत्यावर नाही हें ते पहात नाहीत. शिवाय चार आण्यांच्या मालावर अेक पैसा, नऊदहा आण्यांवर दोन पैसे असा फाजील कर वसूल होतो. जनावरांच्या साह्याने वापरल्या जाणाऱ्या शेतकीच्या उपकरणांवर कर नाही, परंतु त्याकरतां लागणाऱ्या लोखंडावर कर आहे, आणि तो अर्थातच हा माल विकतांना गिऱ्हाअिकाकडून वसूल होतो. व्यापारी स्वार्थीच असतात, यामुळे गुळावरील निर्बंध काढल्यापासून तो आठ ते बारा आणेपर्यंत देखील विकला जात आहे यांत नवल नाही, पण म्युनिसिपालिटीने सुद्धां जनतेकरतां जवळ ठेवलेला गूळ पंचवीस टक्के फायदा घेऊन व्यापाऱ्यांना विकला. तेव्हां कोणावर विश्वास ठेवावा हें समजत नाही. आतां जनतेचें कांग्रेस सरकार याचा विचार करून गिऱ्हाअिकांचा त्रास आणि नुकसान कमी करील अशी आशा आहे. आपला

**दत्तात्रय शिवराम चिखले**

उ. 'बलवंत' कोणत्या पक्षाचें आहे हें माहीत नाही, पण कांग्रेसच्या पक्षाचीं पत्रें कांग्रेसवर टीका छापायला तयार नसतात असा अनुभव आहे. हा कर कांग्रेसने बसवलेला आहे आणि त्याविरुद्ध बरीच ओरड झालेली आहे, पण

कांग्रेसला सध्यां विचार करायला वेळ नसल्यामुळे बरेच कायदे अविचारानेच पास होत आहेत. तरीपण हा कायदा कांही दिवस अंमलांत राहिल्यावर त्याचे फायदेतोटे तपासून त्यांत दुरुस्ती करण्याचाही कांग्रेस सरकारचा विचार आहे असें समजतें. अर्थात् लीगच्या कारवायांमुळे कांग्रेसला सत्ता सोडावी लागण्याचाही संभव आहे, तेव्हां पुढे काय होओील हें नक्की सांगणें कठिण. **सं.**

२

'धनुर्धारी' दिवाळी अंकामधील आपला 'कायदा आणि सामाजिक सुधारणा' हा निबंध वाचला. आपण प्रगट केलेले विचार स्वतंत्र व मनाला चालना देणारे आहेत, परंतु त्यांत ग्रथित केलेलीं तत्वें विवादात्मक आहेत व त्याचप्रमाणें 'समंजस लोक,' 'सुधारणेचा दंडक,' यांतील सुधारणा, सुख, अैहिक सुखाची दृष्टि, कोणती? 'जुलूम व शिस्त यांतील फरक,' 'समाजां-तील घटकांना शक्य तितकें स्वातंत्र्य,' 'न्याय्य हक्कांची पायमल्ली' 'मनुष्याच्या सर्व शक्तींचा विकास होण्याला वाव मिळाला पाहिजे, नाही तर मनुष्य सुखी होणें शक्य नाही,' या बाबतींत अैहिक सुखाबरोबर आध्यात्मिक शक्तीलाही वाव देणें जरूर आहे किंवा नाही? आध्यात्मिक शक्तीने जो मोक्ष मिळणार, तोही समाजस्थैर्याला कारणीभूत होओिल अशा तऱ्हेनें अर्थ करून व वर्तणूक करून उपयुक्त होतो किंवा नाहीं? 'स्वातंत्र्य म्हणजे चुका करण्याचेंही स्वातंत्र्य,' वगैरे वगैरे शब्दांचीही सविस्तर व संपूर्ण फोड करणें जरूर आहे. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. 'वैयक्तिक वागणुकीच्या बाबतींत होता होओील तों ढवळाढवळ करणार नाहीत,' यांत व्यक्तींचें वयोमान व परिस्थितिही विचारांत घ्यावी लागेल. या दृष्टीने या लहानशा लेखांत पहिल्या प्याऱ्यांतील सुधारणेचा दंडकही नमूद केलेला दिसत नाही. कायदे लिखित आणि अलिखित असूं शकतात, धर्मबंधनें, जातिबंधनें व सामाजिक व खाजगी बंधनें असल्याने व त्यांचें स्वयंस्फूर्तीने जाणीव बाळगून पालन केल्यानेच समाजसुधारणा होओील, व व्यक्ति सुखी होतील. बंधनांविरुद्ध ओरड व स्वैर वृत्तीला मोकाट वाव,

यायोगें समाज दुःखी होईल. मिनिस्टर बॉल्डविनने अिंग्लंडचे राजालाही पदच्युत करून टाकलें. त्यानें असें म्हटलें आहे की मिनिस्टराअितकीच समाजांतील सर्व घटकांची व व्यक्तींची सर्व बाबतींत सदैव जोखीम अोळखण्याची ताकद असली तर मग कायदे नकोत, कोर्टें, जेल, पोलीस व मिलिटरीही नको. समाज हा वेडा, त्यांतील अेकादा घटक मात्र सुज्ञ व समंजस असतो, तेव्हां त्यांनीच सर्वांना शिस्त लावणें रास्त होय, हा जुलूम नव्हे. **श्री. ग. मणेरीकर.**

उ. आपलीं मतें आमच्या बरोबर विरुद्ध आहेत व आपणास खरोखर उत्तर देण्याकरतां बरेच ग्रंथ लिहावे लागतील. तथापि कांही महत्वाच्या मुद्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करतों. अैहिक सुखाची दृष्टि अशी की मरणानंतर काय होणार याची परवा नाही, या जगांतच सर्वांना सुख मिळावें अशी खटपट करायची. आध्यात्मिक शक्ति हें आमचें मतें थोतांड आहे. कांहींचा तीवर प्रामाणिकपणें विश्वास असला, तरी आमचे मतें त्यांत तथ्य नाही. पुनर्जन्म हेंच थोतांड असल्यामुळे मोक्ष सर्वांनाच मिळतो, त्याकरतां खटपट करावी लागत नाही. मोक्ष हा स्वतःकरतां मिळवण्याची धार्मिक लोकांची खटपट असते, त्यांना समाजाच्या कल्याणाची बिलकुल दिक्कत नसते. आणि खरोखर ज्यांना आध्यात्मिक गोष्टींचें महत्व वाटतें, ते अैहिक सुखाला तुच्छ समजतात. मग त्यांचें व आमचें पटावें कसें ? त्यांची दृष्टीच वेगळी. मात्र त्यांनी अीश्वरचिंतन किंवा असेंच कांहीतरी करीत बसावें, अितर भानगडींत ढवळढवळ करूं नये आणि आध्यात्मिक शक्तीच्या थापाही देऊं नये. शिस्त कांही ठिकाणीं रास्त असते, म्हणजे सर्वांच्या फायद्याची असते, उदाहरणार्थ रस्त्यांत गाड्या डाव्या ( किंवा उजव्या ) बाजूने हांकाव्या असा कायदा केल्याने सोयच होते, तेथे कोणाचाही विरोध नसतो. पण जेव्हां जरूरीशिवाय केवळ 'कांहीतरी निर्बंध पाहिजे' या तत्वावर कायदे केलेले असतात तेव्हां तो जुलूम होतो. स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थच पुष्कळांना कळत नाही. ते म्हणतात स्वातंत्र्य म्हणजे चांगल्या गोष्टी करण्याचें स्वातंत्र्य, आणि चांगल्या गोष्टी कोणत्या हें ते ठरवणार ! याचा अर्थ त्यांच्या मताने सर्वांनी वागलें पाहिजे. याला आम्ही

स्वातंत्र्य म्हणत नाही. निर्बंध अेकच पाहिजे, की दुसऱ्याचें नुकसान करता नये. तें केल्यास मात्र शिक्षा व्हावी. अेरवीं कोणत्याही बाबतींत निर्बंध असता नये. यालाच आम्ही चुका देखील करण्याचें स्वातंत्र्य म्हणतों, आमच्या चुकांचे परिणाम जोंपर्यंत दुसऱ्याला भोगावे लागत नाहीत, तोंपर्यंत आम्ही पाहिजे तें करूं. हेंच वैयक्तिक स्वातंत्र्य. व्यक्तीचें वयोमान व परिस्थिति पाहिली पाहिजे, हें फक्त लहान मुलांना किंवा वेड लागलेल्या माणसांना लागू आहे. आणि लहान मुलांवरही पुष्कळ वेळां जुलूमच होत असतो. घरीं मुलांची कटकट नको, म्हणून आअीबाप त्यांना शाळांत पांच तास डांबून ठेवतात, हें रास्त नाही. स्वयंस्फूर्तीनें जीं बंधनें पाळावीं लागतात, त्यांकरतां कायदे लागत नाहींत आणि तींही पुष्कळ वेळां निरर्थक असतात. अर्थात् दुसऱ्याला त्रास होतां नये असें वर म्हटलेंच आहे. त्यांतच हीं बंधनें येतात. शिष्टाचाराचा उद्देश हाच असतो की निष्कारण दुसऱ्याचें मन दुखवूं नये. यांत 'निष्कारण' हा शब्द महत्वाचा आहे. कारण जेथे जरूर असेल, म्हणजे कांही महत्वाचा मुद्दा असेल, किंवा आपले हक्क बजावणें जरूर असेल, तेथे कोणाचें मन दुखावेल याची पर्वा करतां नये. तेथें आपल्याला रास्त वाटेल तेंच केलें पाहिजे. मग तेथे कायद्याचीही पर्वा न करतां वागावें लागेल. बंधनांची जाणीव बाळगून वागल्याने समाजसुधारणा होअील, ही आपली समजूत मात्र साफ चुकीची आहे. बंधनें म्हणजे चालू रूढि, आणि सुधारणा म्हणजे रूढींत बदल. रूढि पाळल्याने रूढींत बदल कसा होणार? कायदा किंवा रूढि बदलणें असेल, तर ती बंडखोरीने, म्हणजे रूढि आणि कायदा मोडणारांकडूनच शक्य आहे. जोंपर्यंत कोणी बंड केलें नाही, तोंपर्यंत कांही चूक आहे हें कोणाच्या लक्षांतच येत नाही. तेव्हां आपली बंधनांची तरफदारी फोल आहे. अर्थात् ज्या सनातन्यांना कोणताही फरक नको असेल, त्यांना आपलें म्हणणें पसंत पडेल, पण त्यानें कोणतीही सुधारणा मात्र होणें शक्य नाही. **सं.**

---

# शारदेचें पत्र

परवां ' टाअिम्स ' मधें कोणीतरी पत्र लिहिलें होतें की कोणाला जास्त जगायचें असलें तर गांधींच्यासारखें साधेपणाने रहावें. ही साधेपणाची कल्पना कांही अजब आहे! गांधींचा साधेपणा फक्त धोतराअैवजी पंचा नेसण्यांत आहे, बाकी त्यांच्याअितकी चैन हिंदुस्थानांत किती लोकांची असेल? त्यांच्या शेळीची आणि अन्नाची वेगळी व्यवस्था करावी लागते. जरा कांही झालें की हिंदुस्थानांतले, निदान कांग्रेसपक्षांतले, सर्वांत उत्तम डाक्टर ' मी, मी ' म्हणून हजर होतात आणि अेकंदरींत त्यांच्या तैनातीला अितकी माणसें असतात की याला साधेपणा म्हणणें म्हणजे भाषेचा विपर्यास आहे. खरें म्हटलें तर जास्त जगणें जर कशावर अवलंबून असेल, तर मुख्यतः आनुवंशिक प्रकृतीवर. अपघात किंवा रोगांच्या सांथी वगैरे सोडून दिल्या तर कोण किती जगेल हें केंवळ आनुवंशिक गुणावर कवलंबून राहतें. अर्थात् अन्नाची वगैरे टंचाअी नाही असें आपण धरून चालूं. आणि जे जास्त जगतात त्यांना आपण कां जगलों हें मुळीच माहीत नसतें. अेकाला विचारलें तर तो सांगतो मी दारूला कधीही शिवलों नाही म्हणून जास्त जगलों, दुसरा सांगतो की मी दररोज संध्याकाळीं नियमाने व्हिस्की घेतों म्हणून जगलों. सारांश या बाबतींत लोक जें बोलत असतात, त्याला फारसा अर्थ नसतो.

दुसऱ्या अेका कामत नांवाच्या विद्वानांनी ' टाअिम्स ' मधेंच नैतिक शिक्षणासंबंधी पत्र लिहिलें आहे. आणि त्यांनी धर्म आणि नीति यांचा नेहमीचा घोटाळा केला आहे. त्यांचें म्हणणें की सर्व धर्मांच्या लोकांत अेकी व्हायला पाहिजे असेल, तर विद्यार्थ्यांना अेकमेकांचा दृष्टिकोन समजावून सांगितला पाहिजे. याकरतां सर्व धर्मांचें शिक्षण शाळांतून द्यावें असें त्यांचें म्हणणें आहे. ' याकरतां शाळाखात्याने सर्व धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासाकरतां अेक पुस्तक काढावें आणि तें नैतिक किंवा धार्मिक शिक्षणाकरतां नेमावें. ' अेका धर्मांत जी नीति असते ती दुसऱ्यांत अनीति असते, हें या गृहस्थांना माहीत नसावें हें

आश्चर्य आहे. की त्यांचें असें म्हणणें आहे, की सर्व धर्मांत जो सारखेपणा असेल तेवढाच दाखवावा आणि फरक दाखवूं नये ? असें असेल तर तो तुलनात्मक अभ्यास नव्हे, आणि शिक्षकाने तसें केलें तरी मुलांच्या मनांत अेकदां जिज्ञासा जागृत केली म्हणजे ते तेथें थांबणार नाहीत. क्रिस्ती देशांत दोन बायका करणें हा गुन्हा आहे, मुसलमानी धर्मांत चार बायका आणि पाहिजे तितक्या रखेल्या चालतात, हिंदूमधें परवांपर्यंत पाहिजे तितक्या बायका आणि पाहिजे तितक्या रखेल्या चालत होत्या, पण आतां मात्र कांग्रेसच्या दडपशाहींत सक्तीचें अेकपत्नीव्रत आलें आहे. पण तसें धर्मांत सांगितले नाही, तेव्हां आतां नैतिक आणि धार्मिक यांचा घोटाळा करून कसें चालेल ?

अिंग्रजांचें राज्य आल्यावर सनातन्यांचीं देखील डोकीं फिरलीं, आणि अेकीकडे भस्माचे पट्टे ओढणारे वटुकसुद्धां अेकपत्नीव्रताचा पुरस्कार करूं लागले आणि तसा कायदा मंजूर झाला. आतां सोडलग्नाचा कायदा होअील अशी बिलकुल खात्री नाहीं, कारण गांधींच्या हुकूमशाहींत त्यांना पसंत असेल तेवढेंच व्हायचें, आणि त्यांना अेकपत्नीव्रत पसंत असून सोडलग्न पसंत नसणें अगदीं त्यांच्या स्वभावाला धरून आहे. कारण मनुष्याचे जितके हाल होतील तितकें पुण्य लागतें, असें ते प्रत्यक्ष म्हणाले नाहीत तरी त्यांचें तसें मत स्पष्ट दिसतें. तेव्हां कजाग बायको असलेली बरीच, असें देखील ते म्हणायचे, आणि तुकारामाचें उदाहरण प्रसिद्धच आहे. त्याने दोन बायका केल्या होत्या ही गोष्ट वेगळी, पण कजाग बायकोचा त्रास त्याने सोसलाच की नाही ? म्हणूनच बहुधा तो सदेह वैकुंठाला गेला अशी कंडी पिकली असावी. तो गेला असेल कोठेतरी पळून, आणि कजाग बायकोचें समाधान करण्याकरतां तशी कंडी त्यानेच पिकवली असेल. कांग्रेसच्या मूर्खपणाचे आणि आततायीपणाचे जितके मासले दिसतील तितके थोडेच !

अिंग्लंडांतल्या अेका साप्ताहिकाला लिहिलेल्या पत्रांत बेव्हर्ले निकल्स म्हणतात, ' प्रत्यक्ष जिनांनी मला दोन वर्षांपूर्वी सांगितलें की मुसलमान हा हिंदूंपेक्षां अगदी वेगळ्या प्रकारचा प्राणी आहे. आमचा अेकमेकांशीं कोणताही

संबंध नाही, आमची नांवें वेगळीं, कपडे वेगळे, अन्न वेगळें, आमचें आर्थिक जीवन, शिक्षणासंबंधीच्या कल्पना, स्त्रियांना वागवण्याची पद्धत आणि पशूंशीं वागण्याची पद्धत, सर्वच वेगळें आहे.' आणि हे साहेब या थापांना ब्रह्मवाक्य मानतात आणि हें सगळं कशाकरतां? तर हिंदु-मुसलमानांमधील वैर ब्रिटिश सरकारने वाढवलें या आरोपाला उत्तर म्हणून सांगितलें आहे. जिना वकील आहेत, त्यांनी थापा दिल्या यांत नवल नाही, पण कोणत्या समंजस माणसाला त्या खऱ्या वाटतील? उत्तर हिंदुस्थानांत हिंदू आणि मुसलमान सारखाच पोशाख सारखाच करतात, अन्न देखील सारखेंच खातात, फक्त गाईचें मांस हिंदु खात नाहीत आणि मुसलमान खातात, अेवढाच फरक आहे. पंडित नेहरू कांही मुसलमानांबरोबर खाना खात असतांना त्यांचें घेतलेलें अेक छायाचित्र देखील प्रसिद्ध झालें आहे आणि त्यांत सर्वांचे पोषाख सारखे आहेत. नांवाच्या बाबतींत अेका चर्चेत येथील प्रसिद्ध लेखक श्री. अब्बास या मुसलमान गृहस्थांनी अेक गोष्ट सांगितली की अेका मुसलमानी कालेजांत शेरखान शिकंदरखान नांवाचा अेक विद्यार्थी नियमाप्रमाणें नमाज पढायला जात नसे, तेव्हां प्रिन्सिपलने त्याला विचारलें की गैरहजर राहून तूं दररोज २ आणे दंड कां भरतोस? तेव्हां त्यानें सांगितलें, मी हिंदू आहे, मी कसा नमाज पढायला जाऊं? यावर प्रिन्सिपल विचारतात, अरे, तुझे नांवच सांगतें की तूं मुसलमान आहेस. तूं हिंदु कसा असशील? यावर विद्यार्थ्यानें सांगितलें, आमच्या प्रांतांत कोणत्याही सभ्य माणसाच्या नांवाच्या शेवटीं 'खान' हें असायचेंच, मग तो हिंदु असो की मुसलमान असो. आतां शेरखान हें नांव मुसलमानाचेंच कां असावें? शेर म्हणजे वाघ, आणि वाघाला धर्म नसतो. शिकंदर हा महंमदाच्या पूर्वी होऊन गेलेला वीर होता, तोही मुसलमान असणें शक्य नाही. मग हें नांव मुसलमान कसें? शेवटीं त्याला दंड भरावा लागला नाही. तेव्हां धर्मानें कांहीं विशिष्ट बाबींत फरक पडला तरी अेकंदरींत चालीरीतींत फरक नसतो. मुसलमानांच्या उदाहरणावरून किंवा अत्याचारांना भिऊन हिंदूही बायकांना पडद्यांत ठेवूं लागले, हें जिनांना माहीत नाही काय? शिवाय सर्वच मुसलमान पडदा पाळीत नाहीत. हिंदु-

स्थानांतील बहुसंख्य मुसलमान मूळचे हिंदूच असल्यामुळे त्यांनी धर्म बदलला तरी आपले आचार सोडले नाहीत. यामुळेच कांहा मुसलमान देखील शाकाहारी असतात. सारांश जिनांच्या या थापा साहेबांना फसवायला उपयोगी पडल्या तरी हिंदुस्थानांन त्या पचणार नाहीत. ज्या साप्ताहिकांत हें प्रसिद्ध झालें आहे त्याच्या संपादकानेही या पत्राला अेक टीप जोडली आहे. त्यांत ते म्हणतात ' चालीरीतींत कितीही फरक असला तरी त्यांवरून राजकीय भांडण करण्याचें कारण नाही. मुळांतच लॉर्ड मिंटो यांनी हिंदूंनी आणि मुसलमानांनी वेगळे प्रतिनिधि निवडावे असें ठरवलें, हीच मोठी चूक आहे. जिना स्वतः कित्येक वर्षेपर्यंत कांग्रेसचे सभासद होते. ' त्यावेळीं हिंदु-मुसलमानांच्या चालीरीतींत फरक नव्हता काय ? धर्मामुळे वेगळें राष्ट्र होतें, असें आचरट विधान जिनांशिवाय दुसरा कोण करील ?

येथल्या ' प्रभात ' च्या संपादकांनी प्रश्न केला आहे की नौखालीमधल्या अत्याचारांचा सूड म्हणून बिहारमध्यें कांही अत्याचार झाले, पण तरीदेखील बळजबरी किंवा जबरदस्तीचे धर्मांतर असले प्रकार झाले नाहींत, असें असून-सुद्धां गांधी बिहारमध्यें जावून प्राणांतिक उपोषण करण्याची धमकी देतात, आणि नौखालीच्या बाबतींत कांहींच करीत नाहीत हें कसें ? याचें कारण सरळ आहे की गांधी आपली शक्ति ओळखून आहेत. मुसलमान गांधींना बिलकुल दाद देणार नाहीत, कोणी ऐकण्यासारखे असले तर ते हिंदुच. तेव्हां ते बिहारमध्येंच उपोषण करणार. शिवाय त्यांचें प्राणांतिक उपोषण आजपर्यंत कधी झालें नाही असें नाही ! तें वाटेल तेव्हां बंद करतां येतेंच, तेव्हां तें १२५ वर्षें जगण्याच्या आड येअील असें नाहीं. अशा धोरणाने ही धमकी दिलेली आहे. हा गांधींच्या भात्यांतला शेवटचा बाण आहे, उपयोग झाला तर झाला, न झाला तर हल्लीपेक्षा वाअीट काय होणार आहे ? शिवाय नौखालीसंबंधाने ते कांहींच बोलले नाहीत असें नाही. परवां नुकतेंच त्यांनी स्पष्ट सांगितलें की परमेश्वराच्या अिच्छेशिवाय जगांत पान हालत नाही. तेव्हां नौखालींत कांही अत्याचार झाले असले तर परमेश्वराच्या अिच्छेनेच झाले. कोणी म्हणेल की

बिहारचे अत्याचार देखील तसेच कां समजूं नयेत? पण या बोटावरची थुंकी त्या बोटावर करतां न आली तर तें राजकारण काय? गांधींच्या आंतल्या आवाजाने त्यांना सल्ला दिला की तुम्ही बिहारमधेंच जा, नौखालीला जाण्यांत अर्थ नाही. मग गांधीजी बिचारे काय करणार? नंतर बिहारमधें शांतता झालेली पाहून त्यांनी बंगाल्यांतच रहायचें ठरवलें, तेंही आंतल्या आवाजाच्याच सल्ल्याने. हा आंतला आवाज अेखादे वेळीं त्यांना जड जाअील, पण त्याला अिलाज नाही.

तुझी **शारदा.**

**ब्रह्मदेवाचा दिवस.** धार्मिक ग्रंथांचा शास्त्रीय ज्ञानाशीं मेळ घालतांना सर्व धर्मांतल्या सनातन्यांची कशी फजीति होते, हें पुढील उदाहरणावरून उत्तम दिसतें. अीश्वरानें सहा दिवसांत जग उत्पन्न केलें आणि सातव्या दिवशीं विश्रांति घेतली, आणि ही सर्व हकीकत सुमारें तीन हजार वर्षांपूर्वी घडली, असें बायबलांत सांगितलें आहे. पण पृथ्वीचें वय कोट्यवधि वर्षें असलें पाहिजे, असें शास्त्रज्ञांचें निश्चित मत आहे. शास्त्रीय ज्ञानाशीं विसंगति दिसली तर बायबलची किंमत कमी होअील, तेव्हां या दृष्टीने विचार करण्याकरतां क्रिस्ती तज्ञांची अेक समिति १९०९ सालीं बसली होती. शेवटीं त्यांनी निकाल दिला की 'दिवस' या शब्दाचा नेहमीचा अर्थ म्हणजे '२४ तास' हा तेथे घ्यायचा नसून दिवस म्हणजे 'अनिश्चित काल' असाच घेतला पाहिजे, म्हणजे सहा दिवसांत कोट्यवधि वर्षांचा समावेश सहज करतां येअील. पण अीश्वरानें सहा अनिश्चित कालांत जग उत्पन्न केलें आणि सातव्या अनिश्चित कालीं त्याने विश्रांति घेतली, याचा काही अर्थ होतो काय? हल्ली रविवार हा सातवा दिवस समजून अीश्वराप्रमाणें आपणही रविवारीं विश्रांति घ्यावी या तत्वावर रविवारीं कोणतेंही काम करूं नये असें क्रिस्ती लोक म्हणतात. दिवस म्हणजे अनिश्चित काल असेल तर रविवार सातवा दिवस कसा? 'ब्रह्मदेवाचा दिवस' ही कल्पना देखील अशीच आहे. माणसांना अर्थ समजायला पाहिजे असेल तर शब्दांचे अर्थ अशा रीतीने न बदलणें बरें.

---

## नवीन सामाजिक नाटक

# न्यायाचा शोध

### ( चार अंकी गद्य–संगीत नाटक )

लेखक, र. धों. कर्वे, अेम्. अे.

**किंमत १ रु., ट. ख. ४ आणे.**

या नाटकांतील पद्यें वगळल्यास तें गद्य नाटक होईल, त्यांत अितर कोणताही फरक करावा लागणार नाही. या नाटकांत लेखकाने कोणताही प्रचार करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

**राअिट अेजन्सी,** नवी भटवाडी मुंबई–४.

## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर
**कोल्हापूर:** स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.
**बेळगांव:** जे, एम्. माणूरकर, खडे बाजार.
**अहमदनगर:** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ
**औरंगाबाद :** मो. प. मुळे, बुकसेलर, खारा कुवा.
**मडगांव, गोवा:** मा. पं. रायकर
**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी
**ग्वाल्हेर :** डोके ब्रदर्स, लष्कर.
**बेलापूर रोड :** ना. अ. पेंडसे.
**कुमठा :** आर्. एम्. कामत
**नागपूर :** सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.
**बारामती :** मोहन बुकडेपो.
**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**वार्षिक वर्गणी :** मनीआर्डरीने दोन रुपये, व्ही. पी. ने सवादोन.

Retered B. No. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ६ आणे.

३. संततिनियमन [ सचित्र ], ८ वी आवृत्ति खलास.

४. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ. रु. १, ट. ख. ४ आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट. ख. ५ आ.

६. त्वचेची निगा. किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ४ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ५ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ४ आ.

१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक नाटक ) किंमत १ रु., ट. ख. ४

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.

२. मूळव्याध. किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.